संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी

नाशिक महानगरपालिका नाशिक
सामान्य प्रशासन विभाग
कोटेशन नोटीस २०२२

नाशिक महानगरपालिकेस खालील तक्तयात नमुद केलेले साहित्य पुरविणे कामी दर मंजुर करुन त्या दराने काम करणेस अनुभवी पुरवठादार व केटरर्स यांचेकडुन कोटेशन मागविण्यत येत आहे .

| अ.क्र | तपशिल | अंदाजे संख्या |
|---|---|---|
| १ | चहा — २ (सकाळ व दुपार)<br>दुपारचे भोजन<br>पाणी | ३६० प्रशिक्षणार्थी |

अटि / शर्ते

१) वरील कामाचे कोटेशन पत्रक (अटिशर्तीसह www.nmc.gov.in) या संकेत स्थळावर दि.२१ /११ /२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजे पावेतो उपलब्ध आहे .
२) कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतीम मुदत दि.२१/११ /२०२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही .कोटेशन पाकिटे सामान्य प्रशासन विभाग, राजीव गांधी भवन शरणपुररोड येथे स्विकारण्यात येतील .
३) सदरचे साहित्य कालीदास कला मंदीर किंवा आदेशात नमुद केल्याठिकाणी पोहोच करावे लागेल . त्यासाठी वेगळा वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.
४) सदरचे दरपत्रकात सर्व करासह दर नमुद करावयाचे आहेत. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही. कोटेशन सोबत पॅन कार्ड, वैध शॉप अॅक्ट दाखला तसेच जीएसटी नोंदणी बाबतचे, अन्न व औषध प्रशासन विभागाकडील फुड परवाना, कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही.
५) मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक—भाखस-२०१४ /प्र.क्र.८२ भाग ३/उद्योग, दिनांक १ डिसें २०१६ या शासन निर्णया सोबतच्या खरेदी पुस्तिकेतील परिच्छेद क्र .५.१४ मधील तरतुदीनुसार सूक्ष्म व लघु उद्योगांकरीता वस्तुंचे आरक्षण देण्यात आलेले असल्याने त्यांना प्राधान्य देण्यात येईल.
६) कोणतेही कोटेशन स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील.
७) सदरचे दरपत्रकात सर्व करासह व अनुषंगीक खर्चासह दर नमुद करावयाचे आहेत. कोणतयाही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

Sd/-
(मनोज घोडे पाटील)
उप आयुक्त (प्रशासन)
नाशिक महानगरपालिका नाशिक

नाशिक महानगरपालिका , नाशिक

आस्थापना विभाग

सर्व साधारण अटी शर्ती ( कोटेशन)

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही . सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण मालाचा पुरवठा करणे / काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल . तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील .

४) ज्यांची संपुर्ण किंवा भागशः कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र रु ५२०/- चे जनरल स्टॅप पेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल . तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल .

५) जी.एस.टी करासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

६) मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास / काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर / केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रकमेवर दर हजारी दर दिवसाला र. रु १ याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील.

८) एकुण बिलाच्या रक्कमेतुन कामाचे स्वरुप विचारात घेता आवश्यकतेनुसार ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल . मालाचा पुरवठा झाल्यानंतर सहा महिन्यापर्यंत मालाच्या दर्जाबाबत काही तक्रार न आल्यास अथवा प्रयोजनाचा हेतु पुर्ण झाल्यानंतर मागणीनुसार सदरची रक्कम परत करण्यात येईल.

९) मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास / मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचा माल / काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

१०) मंजुर नमुन्याप्रमाणे / स्पेशिफ़िकेशनप्रमाने मालावर पुरवठा न झाल्यास /काम न झाल्यास माल परत करण्यात येईल / अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील .

११) कोणताही माल मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन खरेदी करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही . याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही .

१२) अटी / शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील .

१३) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या मालाच्या दरात / कामाच्या दरात/सेवेच्या/दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही .

१४) पुरवठाधारकाने अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१६) काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

१७) मा.शासनाचे गव्हमेंट ई मार्केटप्लस (GeM) पोर्टलवर सदरचे बाबीचे दर उपलब्ध असलेस आणि गुणवते बाबत साम्य असलेस अशा बाबत (GeM) वरील दराशी तुलना करणेत येईल. पोर्टलवरील दरापेक्षा कोटेशन दर कमी असलेस असे दर मंजुर करणे बाबत विचार करणेत येईल अन्यथा (GeM) वरील दराने खरेदी करणे बाबतचा अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

(मनोज घोडे पाटील)
उप आयुक्त (प्रशासन)
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने माल पुरविण्यास / सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे . त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

नाशिक महानगरपालिका , नाशिक

सामान्य प्रशासन विभाग

कोटेशन फॉर्म २०२२

**कामाचे नाव ;-** नाशिक महानगरपालिकेस चहा, पाणी व भोजनाचा पुरवठा करणे.

**कामाची मुदत ;-** १. पुरवठा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसाच्या आत सर्व मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.
२. सदरचे दर ९० दिवसा पावेतो बंधनकारक राहातील.

**कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत ;-** दि. २१ /११ /२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत

**कोटेशनधारकाचे नाव व पत्ता ;-** ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

**संपर्क क्रमांक ;-----------------------**

उक्त प्रमाणे कामाचे अटीशर्ती व स्पेशिफ़िकेशन नुसार साहित्य पुरविणेकामी मी / आम्ही पुढीलप्रमाणे सर्व करांसह दर सादर करीत आहोत .

| अ.क्र | तपशिल | संख्या | दर सर्व करासह प्रती नग रक्कम रु | सर्व करासह एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | चहा – २ (सकाळ व दुपार)<br>दुपारचे भोजन<br>पाणी | ३६० प्रशिक्षणार्थी | | |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटि शर्ती मी वाचले असुन मला त्या मान्य आहेत . सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने ९० दिवसा करीता कालावधीकरीता उक्त चहा, पाणी व भोजनाचा पुरवठा करण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे .

दिनांक:-

ठिकाण:-

निविदाधारकाची सही व शिक्का

कार्यालयीन उपयोगासाठी